आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता

२० ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- देशातल्या डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी सर्वोच्च न्यायालयाने केली नॅशनल टास्क फोर्सची स्थापना/ कोलकाता प्रकरणातला चौकशी अहवाल येत्या गुरुवारी सादर करण्याचे सीबीआय ला दिले निर्देश

- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना जारी
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मलेशियाच्या प्रधानमंत्र्यांबरोबर महत्त्वपूर्ण चर्चा
- माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र सद्भावना दिवसाचे कार्यक्रम

**आणि**

- महाराष्ट्रात बदलापूर इथं दोन शाळकरी मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याप्रकरणी संतप्त नागरिकांचं आंदोलन

**<><><><><>**

देशातल्या डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना सुचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय कृती दलाची स्थापना केली आहे. या कृती दलाला तीन आठवड्यात अंतरिम अहवाल आणि दोन महिन्यात अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठाने आज दिले आहेत. या कृती दलाध्ये देशभरातल्या डॉक्टरांचा समावेश असून आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी काय करता येईल याबद्दल ते सल्ला देतील. कोलकाता डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणी सुनावणीवेळी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेविषयी चिंता व्यक्त केली. हे प्रकरण एका हत्येपुरतं मर्यादित नसून देशभरातल्या डॉक्टरांच्या आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या प्रश्नाशी निगडित

असल्याची टिप्पणी चंद्रचूड यांनी केली. या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण संस्थेने केलेल्या तपासाचा अहवाल २२ ऑगस्ट पर्यंत सादर करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

या प्रकरणात तपासात राहिलेल्या त्रुटीबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. हत्येला आत्महत्या ठरवण्याचा प्रयत्न केला गेला, एफआयआरमध्ये हत्येचा उल्लेख केला गेला नाही, याबद्दल न्यायालयाने वैद्यकीय महाविद्यालय प्रशासन आणि पोलिसांना जाब विचारला. तसंच पीडितेची ओळख सार्वजनिक करणं हे धक्कादायक असल्याचंही न्यायालयानं म्हटलं आहे. जमावाने घटनास्थळावर जाऊन तोडफोड केली, तसंच पुराव्यांशी छेडछाड करण्याचा प्रयत्न केला, यावर पोलिसांनी काहीच कारवाई का केली नाही असा जाब न्यायालयाने विचारला.

आरोग्य कर्मचाऱ्यांची कामाची जागा सुरक्षित असणं महत्वाचं असल्याचं न्यायालयाने म्हटलं. देशभरातल्या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेत कोणतीही कमतरता राहणार नाही, याबद्दल आश्वस्त करत न्यायालयाने आरोग्य कर्मचाऱ्यांना कामावर परतण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी आज निवडणूक आयोगानं आज अधिसूचना  जारी केली. पहिल्या टप्प्यात १८ सप्टेंबरला  मतदान होणार असून त्यात पुलवामा, अनंतनाग, शोपियां, कुलगाम, रामबन, किश्तवाडा आणि डोडा जिल्ह्यांतील २४ विधानसभेच्या जागांचा समावेश आहे. निवडणूक आयोगानं पम्पोर,त्राल,पुलवामा, राजपुरा, जैनापुरा, शोपिया,डी.एच. पोरा, कुलगाम, देवसर, दुरू,कोकेरनाग, अनंतनाग पश्चिम, अनंतनाग, श्री गुफवाडा जीज बेहरा, शांगस-अनंतनाग पूर्व, पहलगाम, इंदरवाल, किश्तवाड, पद्दर-नागसेनी, भदरवाह, डोडा,डोडा-पूर्व, रामबन आणि बनिहाल इथल्या विधानसभेच्या जागांसाठीही अधिसूनचा जारी केली आहे. या जागांसाठी

२७ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहे. २८ ऑगस्टला अर्जांची छाननी केली जाईल. अर्ज मागं घेण्याची शेवटची तारीख ३० ऑगस्ट आहे. विधानसभेच्यासाठी मतदारांची यादी आज जाहीर होण्याची शक्यता असून मतदारांची संख्या किमान ९० लाखांच्या आसपास असेल. जम्मू आणि काश्मीरमध्ये एकूण ८७ लाख ९ हजार मतदार असून त्यात ४४ लाख ४६ हजार पुरुष तर ४२ लाख ६२ हजार महिला आहेत. २० लाख ७ हजार युवा मतदार पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जम्मू काश्मिरमध्ये ९० विधानसभेच्या जागा असून त्यात ७४ खुल्या वर्गासाठी, ७ अनुसुचित जाती आणि ९ अनुसुचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव आहेत.

<><><><><>

नैसर्गिक आपत्तींमुळे होणारी जीवितहानी रोखण्यासाठी अशा आपत्तींची पूर्वसूचना देणारी यंत्रणा सक्षम आणि अचूक करण्याची गरज असल्याचं मत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज मांडलं. राष्ट्रपती भवन इथं राष्ट्रीय पृथ्विविज्ञान पुरस्कारांचं वितरण केल्यानंतर त्या बोलत होत्या.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून पोलंड आणि युक्रेनच्या तीन दिवसीय दौऱ्यावर असतील. नवी दिल्लीत काल झालेल्या पत्रकार परिषदेत परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव तन्मय लाल यांनी ही माहिती दिली. ४५ वर्षांनंतर भारतीय प्रधानमंत्री पोलंडला भेट देणार असल्यानं हा दौरा महत्त्वाचा असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. प्रधानमंत्री मोदी पोलंडचे प्रधानमंत्री डोनाल्ड टस्क यांच्याशी संवाद साधतील, तसंच राष्ट्राध्यक्ष आंद्रे डुडा यांच्याशीही चर्चा करतील. त्यानंतर ते वॉर्सा भागातल्या भारतीयांची भेट घेतील. २३ ऑगस्टला युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्या निमंत्रणावरुन ते युक्रेन भेटीवर रवाना होतील. दोन्ही नेत्यांमध्ये यावेळी उच्चस्तरीय चर्चा होईल. रशिया -युक्रेन संघर्षावर शांततापूर्ण उपाय

सुचवण्यासाठी भारत आवश्यक ते योगदान आणि शक्य तेवढा पाठिंबा देईल, असंही लाल यांनी सांगितलं.

<><><><><>

भारत आणि जपानदरम्यान आज नवी दिल्लीत मंत्रिस्तरीय संवाद होणार आहे. भारताकडून संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर तर जपानचे संरक्षणमंत्री किहारा मीनोरू आणि परराष्ट्र व्यवहारमंत्री योको कामिकावा या संवादात सहभागी होतील. या द्विपक्षीय बैठकीत दोन्ही देशांदरम्यानचे संबंध अधिक बळकट करण्यासाठी नव्या उपक्रमांविषयी चर्चा होईल आणि द्विपक्षीय सहकार्याचाही आढावा घेतला जाईल. भारत आणि जपानशी संबंधित धार्मिक आणि जागतिक प्रश्नांवरही या बैठकीत चर्चा होईल. या बैठकीमुळे धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी अधिक बळकट होईल आणि संरक्षण सहकार्यामध्येही सुधारणा होतील, अशी आशा भारतीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने व्यक्त केली आहे. दुसरा मंत्रीस्तरीय संवाद येत्या सप्टेंबर महिन्यात जपानमध्ये होणार आहे.

<><><><><>

मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम सध्या तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून ते आज नवी दिल्ली इथं त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान उभय देशांदरम्यान डिजिटल तंत्रज्ञानविषयक अनेक महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. या भेटीनंतर मोदी यांच्या वतीने स्नेहभोजनाचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यानंतर इब्राहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांचीही भेट घेतील.

<><><><><>

भारत आणि मलेशिया यांच्या दरम्यान व्यापार वाढवणं महत्वाचं असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत

झालेल्या भारत-मलेशिया सीईओ मंचावरुन ते बोलत होते. दोन्ही देशातल्या उद्योग आणि व्यापाराला बळकटी देण्यासाठी सहकार्याची गरज त्यांनी व्यक्त केली. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, पर्यटन, डिजिटल अर्थव्यवस्था आदी क्षेत्रांमध्ये दोन्ही देश परस्परांना सहकार्य करू शकतात असं गोयल यांनी म्हटलं आहे. तेल आणि वायू उद्योगात भारत प्रगती करत असून मलेशियन कंपन्यांना यात अनेक संधी असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशाचे माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांची आज ८० वी जयंती असून हा दिवस सद्भावना दिवस म्हणून पाळला जातो.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ही समाजमाध्यमावरून राजीव गांधी यांना आदरांजली वाहिली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत वीर भूमी या राजीव गांधी यांच्या समाधीस्थळी जाऊन पुष्पांजली अर्पण केली.

मुंबईत राजभवनात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनीही राजीव गांधी यांना आदरांजली वाहिली. राजभवनातील अधिकारी, कर्मचारी, मुंबई पोलिस दलाचे अधिकारी आणि जवानांना तसंच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांना सद्भभावनेची प्रतिज्ञा दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही आज, मंत्रालयात राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सद्भवना दिनाच्या कार्यक्रमात उपस्थित असलेल्यांना उपमुख्यमंत्र्यांनी समाजात एकता, शांतता, बंधुता, सामाजिक सद्भावना कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ दिली.

**<><><><><>**

नवी दिल्लीत **होणाऱ्या** १९ व्या CII भारत आफ्रिका व्यापारी परिषदेत सहभागी होण्यासाठी लायबेरियाचे उपराष्ट्रपती जेरेमिया कपान कोंग आज दिल्लीत दाखल

झाले. कोंग यांच्या भारत दौऱ्यामुळे उभय देशांमधील संबंध अधिक दृढ होतील, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये नमूद केलं आहे.

CII भारत आफ्रिका व्यापारी परिषदेला आजपासून सुरुवात होत असून २२ ऑगस्टपर्यंत ती चालणार आहे. आफ्रिकेच्या विकासात आणि प्रादेशिक आणि जागतिक पुरवठा साखळींच्या एकात्मतेत भारत-आफ्रिका भागीदारीची भूमिका वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणं हा या परिषदेचा उद्देश आहे. संयुक्त राष्ट्रांच्या विविध मंचांवर भारताच्या उमेदवारीला लायबेरियानं पाठिंबा दिला आहे.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यातल्या बदलापूर इथल्या एका शाळेत दोन विद्यार्थिनींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्यावर पॉक्सोसह संबंधित कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्याचं, तसंच यासाठी एक विशेष सरकारी वकील नेमण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं. दरम्यान, या घटनेमुळे संतप्त झालेल्या पालक आणि नागरिकांनी बदलापूर रेल्वेस्थानकात रेल्वे रोको आंदोलन सुरू केलं आहे. यामुळे रेल्वेसेवा विस्कळीत झाली आहे. परिस्थिती हाताळण्यासाठी या परिसरात पोलीस बंदोबस्त करण्यात आला आहे आणि पोलिसांनी आंदोलकांना रेल्वेमार्ग मोकळे करण्याची विनंती केली आहे. दरम्यान विविध रेल्वेगाड्या आधीच्या स्थानकांवर थांबवण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्य महिला आयोगानं या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पोलिसांनी आत्तापर्यंत केलेल्या तपासाचा अहवाल मागवला आहे. संबंधित शाळेनं माफीनामा जारी केला असून शाळेच्या मुख्याध्यापिकेला निलंबित करण्यात आलं आहे. तसंच मुलांची जबाबदारी असलेल्या दोन सेविकांनाही कामावरून कमी करण्यात आलं आहे.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता

२० ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात मोसमी पाऊस पुन्हा सक्रीय झाला असून येत्या चार दिवसात देशाच्या पूर्व,पश्चिम, वायव्य भागात तसंच मध्य भारतात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. याशिवाय दक्षिणेकडील द्विपकल्प भागातही उद्यापर्यंत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

//<><><><><>//